MHKO160006152018

## रेग्युलर दिवाणी दावा क्रमांक १२२/२०१८ मधील निशाणी क्रमांक ०५ वर आदेश

**०१**.      वादीने हा अर्ज दिवाणी व्यवहार संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाखल केला आहे.

**०२**.      वादीचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे (नि.क्रं.१९)व दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकता माझ्या विचारार्थी खालील मुददे उपस्थित होतात. त्यावरील माझा निष्कर्ष कारणेमिमांसेसह खालीलप्रमाणे नमूद करत आहे

| अ.क्रं. | विचारार्थी निघालेले मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने प्रथमदर्शनी प्रकरण शाबीत केले आहे काय ? | ... नाही .. |
| २. | तुर्तातुर्त मनाई आदेश न मिळाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | ... नाही .. |
| ३. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | ... नाही .. |
| ४. | काय आदेश ? | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

### कारणमिमांसा

**मुददे क्रमांक १ ते ४ करीता –**

**०३**.      वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की मौजे आलतूर, ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर येथील गट नंबर ७१५, एकूण क्षेत्र ६५ आर त्यापैकी वादी व प्रतिवादी यांची मिळकत क्षेत्र ०.३२.५१ आर आहे. प्रतिवादीच्या नावे असलेली गट नंबर ७१५ मधील ०.३२.५१ आर पैकी उत्तरेकडील निम्मे क्षेत्र वादीच्या मालकीवहिवाटीचे आहे व दक्षिणेकडील उर्वरीत क्षेत्र प्रतिवादीच्या

मालकीवहिवाटीचे आहे. गट नंबर ७१५ च्या उत्तरेस पडसर जागा आहे व त्या पडसर जागेच्या उत्तरेस प्रतिवादीचे घर व प्रतिवादीच्या घराच्या उत्तरेस वादीचे घर आहे. पडसर जागेमध्ये पूर्वेकडील भाग वादीचा आहे व पश्चिमेकडील भाग प्रतिवादीचा आहे.

०४. वादीच्या ताब्यात असलेल्या पूर्व बाजूकडील पडसर जागेमध्ये पूर्व बाजूस ३.५ फुट व दक्षिण बाजूस १० फुट असे अतिक्रमण प्रतिवादींनी केले आहे. गट नंबर ७१५ मध्ये वादीच्या जागेत २०.५ फुट पूर्व–पश्चिम व २० फुट दक्षिण–उत्तर या मापाने प्रतिवादीने अतिक्रमण केले आहे.

०५. यामुळे वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की प्रतिवादींनी वादीच्या कब्जेवहिवाटीस असलेल्या पूर्व बाजूकडील पडसर जागेमध्ये पूर्व बाजुत ३.५ फुट, दक्षिण बाजूत १० फुट अतिक्रमण करु नये तसेच गट नंबर ७१५ मध्ये वादीच्या ताब्यातील क्षेत्रामध्ये पूर्व–पश्चिम २०.५ फुट व दक्षिण–उत्तर २० फुट अतिक्रमण करु नये व वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये.

०६. प्रतिवादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की प्रतिवादीने वादीच्या कोणत्याही मिळकतीमध्ये अतिक्रमण केले नाही. मौजे आलतूर, ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर येथील ग्रामपंचायत असेसमेंटला नोंद असलेली मिळकत नंबर १२५ क्षेत्र ४५० चौरस फुट हे प्रतिवादीच्या ताब्यातील पूर्वीपासूचे अर्धेपक्के दगड विट मातीचे घर होते. ते पाडून त्याच ठिकाणी प्रतिवादीने ४५० चौरस फुट मध्येच शासनाच्या रमाई आवास योजनेअंतर्गत रितसर परवानगी घेवून आर.सी.सी.पध्दतीचे घर बांधले आहे.

०७. वादीने या कामी दावा दाखल करतेवेळी ग्रामपंचायत आलतूर मधील गावठाण हददीतील प्रतिवादीच्या नावची घर मिळकत नंबर १२५ व वादीच्या नावची घर मिळकत नंबर १२६ यांचा उल्लेख केला नाही. वादीने नि.क्रं.२४ सोबत मिळकत नंबर १२५ व मिळकत नंबर

१२६ यांचा ग्रामपंचायत, आलतूर येथील नमुना नं.८ उतारा हजर केला आहे. त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी दोघांचीही मिळकत नंबर १२५ व १२६ यांचे क्षेत्र ४५० चौरस फुट असून लांबी ३० फुट व रुंदी १५ फुट आहे. या उता–यांमध्ये पडसर जागेचे वेगळे क्षेत्र नमूद नाही. वादीने दाव्यासोबत जोडलेल्या हातनकाशातील पडसर जागेवर आपली मालकी व ताबा असल्याचे सिध्द केले नाही.

०८.      गट नंबर ७१५ हा प्रतिवादीच्या नावे आहे. वादी व प्रतिवादी यांच्या इतर जमिनी सन १९९० पासून फेरफार क्रमांक २१७ प्रमाणे निम्म्या निम्म्या वहिवाटीस आल्या आहेत. त्या फेरफारामध्ये दावा गट नंबर ७१५ चा उल्लेख नाही. प्रतिवादीचे कथन आहे की प्रतिवादीचे बांधकाम मिळकत नंबर १२५ मधील त्याचे मालकीवहिवाटीतील ४५० चौरस फुट मध्येच आहे. प्रतिवादी रितसर परवानगी घेवून बांधकाम करत आहे. प्रतिवादीला शासनाची योजना मंजूर झाली आहे. तुर्तातुर्त मनाई दिल्यास प्रतिवादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. वादीला गट नंबर ७१५ मिळकत नंबर १२५ व १२६ मोजून घेवून अतिक्रमण आहे किंवा नाही हे सिध्द करण्याची मुभा आहे. प्रतिवादी करत असलेले बांधकाम त्याची ग्रामपंचायत, आलतूर येथील मिळकत नंबर १२५ क्षेत्र ४५० चौरस फुट, लांबी ३० × १५ फुट याचे बाहेर आढळल्यास ते पाडता येवू शकते. दाव्याचा कल वादीच्या बाजूने नाही. म्हणून मी मुददे क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुददा क्रमांक ४ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

**०१.** अर्ज नामंजूर करण्यात येतो.

**०२.** खर्चाचा आदेश दाव्यासोबत.

सही/–
(अ.अ.वाळूजकर )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
मलकापूर–शाहुवाडी

दिनांक –११/१२/२०१८

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer : S.A.SHINDE
Name of the Court : A.A.Walujkar, C.J.J.D &
J.M.F.C. Malkapur-Shahuwadi,

Date of order : 11/12/2018
Order signed by the presiding
officer on : 11/12/2018
Order uploaded on : 11/12/2018